|| विद्या विनयेन शोभते ||

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे,

# चांगू काना ठाकूर

# मराठी पूर्वप्राथमिक व प्राथमिक विद्यालय

प्लॉट नं. ८, सेक्टर नं. १४, कै. जनार्दन भगत मार्ग,
सिडको कॉलनी, नवीन पनवेल, जि. रायगड, पिन. ४१० २०६
दूरध्वनी : ०२२२ ७४६ ५८८०

# PROSPECTUS
# 2026 - 2027

Scanned with OKEN Scanner




लोकनेते माजी खासदार मा. रामशेठ ठाकूर साहेब यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त संस्थास्तरावर श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर विद्यालय, द्रोणागिरी येथील वेशभूषा स्पर्धेत चि. कियान महेंद्र ठाकूर–तृतीय क्रमांक




लोकनेते माजी खासदार मा. रामशेठ ठाकूर साहेब यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त संस्थास्तरावर रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुल खारघर येथील विज्ञान प्रदर्शनात १ ली व २ री च्या गटात प्रथम क्रमांक



आनंद मेळावा कार्यक्रमात संस्थेच्या संचालिका मा. सौ. अर्चना परेश ठाकूर यांचे स्वागत करताना मुख्याध्यापक

Scanned with OKEN Scanner

# आमचे प्रेरणास्थान



## स्व. जनार्दन आत्माराम भगत

**जन्म : २९/०२/१९२८ मृत्यू : ०७/०५/१९८८**

स्व. जनार्दन आत्माराम भगत साहेब ज्यांनी गोरगरिबांसाठी अथक परिश्रम केले आणि या भागाच्या विकासासाठी आपले संपूर्ण आयुष्य वेचले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी नेहमीच प्रयत्न केले. त्यांचे समर्पित आणि कष्टाळू जीवन आमच्या माननीयांसाठी प्रेरणास्थान बनले. संस्थेची स्थापना करण्यासाठी कार्याध्यक्ष यांनी त्यांच्या स्मृतीचे स्मारक म्हणून संस्थेचे नाव जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल असे ठेवण्यात आले आहे.

Scanned with OKEN Scanner

# आमचे श्रध्दास्थान




## स्व. चांगू काना ठाकूर

कै. चांगू काना ठाकूर साहेब हे सदैव चांगुलपणाच्या मार्गावर चालणारे सोनेरी मनाचे व्यक्ती होते. त्यांनी जीवनाचे साधे पण मौल्यवान तत्वज्ञान सांगितले. आमच्या पूर्व प्राथमिक आणि प्राथमिक विद्यालयाला त्यांच्या नावावरून त्यांची स्मृती आणि स्मारक म्हणून नाव देण्यात आले आहे. त्यांची जीवनगाथा ही एका सामान्य माणसाची यशोगाथा आहे.

Scanned with OKEN Scanner

# आमचे मार्गदर्शक



## मा. श्री. रामशेठ ठाकूर साहेब

कार्याध्यक्ष

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल

आमच्यात संस्थेत कला गुणांचे संस्कार रूजवणारे
आदर्श बालक सुविद्य नागरीक घडविणारे
बुध्दिला सत्याकडे, श्रमाकडे नेणारे
कर्तृत्वाचे विस्तीर्ण पटांगण.

'स्वतः घडा आणि दुसऱ्यांनाही घडवा' हा स्वर्गीय जनार्दन भगत साहेबांचा संदेश घेऊन तसेच त्यांचे अपूर्ण राहिलेले स्वप्न व ध्येय पूर्ण करण्याचा निर्धार मा.श्री.रामशेठ ठाकूर साहेब यांनी केला. भगतसाहेबांची शिक्षणाविषयी असणारी प्रचंड आस्था तसेच गोरगरिबांचा विकास हा शिक्षणाच्या माध्यमातून व्हावा या इच्छापूर्तीतून जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचा जन्म झाला.

'विद्या विनयेन शोभते' या वाक्याचे ब्रीद हाती घेऊन जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चांगू काना ठाकूर मराठी प्राथमिक विद्यालयाची जून १९९४ साली स्थापना करण्यात आली. आतापर्यंत आमच्या शाळेने पनवेल व रायगड परिसरात अनेक सर्वगुणसंपन्न विद्यार्थी घडवायचे भरीव कार्य केले आहे. २१ व्या शतकातील आव्हाने पेलण्यासाठी मानसिक व शारीरिक दृष्ट्या सक्षम विद्यार्थी तयार करणे. विद्यार्थ्यांमधील कलागुणांचा विकास करणे हे ध्येय समोर ठेवून आपले विद्यालय यशस्वीपणे वाटचाल करीत आहे.



Scanned with OKEN Scanner

# संस्थेचे अध्यक्ष



## मा. श्री. अरूण जगन्नाथ भगत साहेब

अध्यक्ष

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था,पनवेल

मा.श्री. अरूणशेठ जगन्नाथ भगत- जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष, राज्य करण्यापेक्षा सेवा करणे हे एखादया व्यक्तीचे सर्वोच्च भाग्य आहे असे मानणारे अतिशय शांत आणि संयमी व्यक्ती आहेत. एक वचनबध्द समाजसेवक असल्याने समाजाच्या हितासाठी विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि आरोग्यविषयक उपक्रमांशी ते निगडीत आहेत. निष्पक्षता, समानता, न्याय, सचोटी, प्रामाणिकपणा आणि विश्वास या तत्त्वांसाठी ते जनतेमध्ये प्रिय आणि आदरणीय आहेत.



Scanned with OKEN Scanner

# संस्थेचे उपकार्याध्यक्ष



## मा. श्री. वाय्. टी. देशमुख साहेब

उप-कार्याध्यक्ष

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल

मा. श्री. वाय्.टी.देशमुख साहेब जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे उपकार्याध्यक्ष हे एक बहुमुखी आणि साधनसंपन्न व्यक्ती आहेत. समाजाच्या हितासाठी विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि आरोग्यविषयक उपक्रमांशी ते निगडीत आहेत. संस्थेच्या सर्वांगीण शैक्षणिक विकासासाठी त्यांची संस्थेला मोठी मदत होत आहे. बहुआयामी व्यक्तिमत्व आणि ज्ञानाचा खजिना असलेले ते उत्तम वक्ते आहेत.

Scanned with OKEN Scanner

# जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल

## कार्यकारी मंडळ

(सन २०२४ ते २०२९)



मा. श्री. अरुण जगन्नाथ भगत
अध्यक्ष



मा. श्री. रामशेठ चांगू ठाकूर (माजी खासदार)
कार्याध्यक्ष



मा. श्री. यशवंत त्रिंबक देशमुख
उप-कार्याध्यक्ष



मा. श्री. प्रशांत राम ठाकूर (आमदार)
सदस्य



मा. श्री. अनिल पांडुरंग भगत
सदस्य



मा. श्री. परेश राम ठाकूर
सदस्य



मा. श्री. प्रकाश जनार्दन भगत
सदस्य



मा. सौ. वर्षा प्रशांत ठाकूर
सदस्या



मा. श्री. संजय शंकर पाटील
सदस्य

Scanned with OKEN Scanner

# जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल

## कार्यकारी मंडळ

(सन २०२४ ते २०२९)



मा. श्री. हरिभाऊ काळुराम पाटील
सदस्य



मा. श्री. संजय जनार्दन भगत
सदस्य



मा. सौ. अर्चना परेश ठाकूर
सदस्या



मा. श्री. अमोघ प्रशांत ठाकूर
सदस्य



मा. श्री. स्वप्नील अरुण ठाकूर
सदस्य



मा. श्रीमती. राज अलोनी
शाखा प्रमुखांच्या प्रतिनिधी



मा. डॉ. सिध्देश्वर तुकाराम गडदे
सदस्य-सचिव

Scanned with OKEN Scanner

# शाळा समिती कार्यकारिणी : २०२५-२०२६


श्री. रामशेठ चांगू ठाकूर
चेअरमन


श्री. यशवंत त्रिंबक देशमुख
सभासद


सौ. अर्चना परेश ठाकूर
सभासद


श्री. संजय जनार्दन भगत
सभासद


डॉ. सिध्देश्वर तुकाराम गडदे
सभासद


श्री. हर्षद रामचंद्र पाटील
सभासद


श्री. प्रदीप विष्णू देशमुख
सभासद


सौ. मंजिरी मंगेश धोत्रे
निमंत्रित (सभासद)


श्रीमती. स्नेहा संजय रडे
शिक्षकेतर सेवक प्रतिनिधी (सभासद)


सौ. सुवर्णा अनिल चौधरी
संस्था कार्यालयीन प्रतिनिधी (सभासद)


श्री. दर्शन अरूण ठाकूर
संस्था अभियंता (निमंत्रित)


श्री. सुभाष गणपत मानकर
सभासद-सचिव

Scanned with OKEN Scanner

# चांगू काना ठाकूर मराठी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विद्यालय, नवीन पनवेल

## 'माझे विदयालय माझे मंदीर'

मुले जशी ही फुले,
उमलली शाळेच्या अंगणी
मीच तयांचा माळी करितो,
ज्ञानाची ही शिंपणी

आज विद्यालय प्रगतीपथावर असताना संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. अरूणशेठ भगत. कार्याध्यक्ष माजी खासदार मा.श्री.रामशेठ ठाकूर व उपकार्याध्यक्ष मा.श्री.वाय.टी.देशमुख यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभत असते.तसेच सर्व कार्यकारी सभासदांच्या मार्गदर्शनाने आम्हांस काम करण्यास प्रोत्साहन मिळते.

जून १९९४ पासून नवीन पनवेल परिसरात कार्यान्वित झालेल्या चांगू काना ठाकूर मराठी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विद्यालयाची प्रगतीकडे अखंड वाटचाल चालू आहे.

"आनंदाने उत्साहाने फुलासवे नाचावे ,
मी शाळेचा शाळा माझी, हेच मजला ठावे."

आमचा विद्यार्थी अष्टपैलू व्हावा असे आम्हाला निश्चितच वाटते. विद्यार्थ्यांना स्वतःला काय हवय, काय करणे आवश्यक आहे याचा निर्णय घेणे, त्यासाठी स्वतःला नीट व्यक्त करता येणे त्याच बरोबर इतरांचं ऐकून, त्यांच्या मतांचा आदर करणे ही जीवनकौशल्ये मुलांमध्ये विकसीत होणं आवश्यक आहे, यासाठी विद्यालयात विविध उपक्रम व स्पर्धा यांचे आयोजन केले जाते.उदा. कथाकथन स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, देशभक्तीपर गीतगायन स्पर्धा, नृत्य स्पर्धा, रंगभरण स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, भाषण स्पर्धा, संस्कृत श्लोक पाठांतर स्पर्धा, स्मरणशक्ती स्पर्धा, वेशभूषा स्पर्धा इ.

आपल्या संस्कृतीचे जतन व राष्ट्रीय मूल्यांची जाणीव करून देण्यासाठी आषाढी एकादशी, गुरूपौर्णिमा, स्वांतत्र्यदिन, रक्षाबंधन, नागपंचमी, गोपाळकाला, दीपपूजा, दिवाळी सण, तिळगूळ समारंभ, प्रजासत्ताक दिन, इत्यादी उपक्रम राबवले जातात.

बालवर्गातील विद्यार्थ्यांच्या शारीरिक व बौद्धिक विकासाला चालना मिळण्यासाठी विद्यालयात शैक्षणिक साधन युक्त कक्ष बनविण्यात आला आहे. त्यासाठी वेळापत्रकात स्वतंत्र तासिका देण्यात आल्या आहेत.प्राथमिक स्तरातील विद्यार्थ्यांसाठी इंटरॅक्टीव क्लास तयार करण्यात आला आहे.त्यादवारे अध्यापन रंजक करून विद्यार्थ्यांच्या विषया संदर्भातील संकल्पना स्पष्ट आणि दृढ करण्याचा प्रयत्न केला जातो.

लहान मुलांमध्ये जिज्ञासा वृत्ती मोठया प्रमाणात असते. मात्र त्यासाठी सतत जाणीवपूर्वक पाठपुरावा करणे आवश्यक असते, त्यासाठी विज्ञान मंडळामार्फत विविध वैज्ञानिक बाबींची माहिती विद्यार्थ्यांना दिली जाते. तसेच 'विज्ञान प्रदर्शनाचे' आयोजनही केले जाते. त्यात प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिस देऊन त्यांचे कौतुक केले जाते.दैनंदिन व्यवहारातील छोटया छोटया प्रयोगांचे प्रात्यक्षिक वर्गातून दाखविले जाते.

विद्यार्थ्यांना व्यासपीठावर बोलण्याची सवय व्हावी, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करता यावे, कार्यक्रमाची रूपरेषा स्वतः तयार करून कार्यक्रम स्वतः पार पाडता यावा, म्हणून विद्यालयात दर वर्षी 'बालसभेचे' आयोजन केले जाते.

आजी आजोबांचे नाते दृढ व्हावे, आपल्या नातवंडांचे शाळेतील कौतुक पाहता यावे म्हणून विद्यालयात दर वर्षी 'आजी-आजोबा दिनाचे' आयोजन केले जाते.

विद्यार्थ्यांना दैनंदिन व्यवहारातील ज्ञान मिळण्यासाठी विद्यालयात 'आनंद मेळा व्याचे' आयोजन केले जाते. त्यामध्ये विविध गृहउपयोगी वस्तूंची खरेदी व विक्री पालक आपल्या पाल्यांसोबत करतात.

विद्यार्थ्यांमध्ये सांघिक वृत्ती, नेतृत्व या गुणांचा विकास व्हावा तसेच ती स्वावलंबी व धीट बनावीत यासाठी विद्यालयात 'कब-बुलबुल' अंतर्गत शिबिराचे आयोजन करण्यात येते. कब-बुलबुल अंतर्गत 'खरी कमाई' या उपक्रमात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्वतः मेहनत करून कमाई केली. त्यात उल्लेखनीय यश प्राप्त केल्याबददल रायगड भारत स्कऊट आणि गाईड यांच्या तर्फे तृतीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले.



Scanned with OKEN Scanner

एप्रिल २०१९ मध्ये घेण्यात आलेल्या ' इंग्लिश मॅरॅथॉन स्पर्धा परीक्षेत ' कु.मैथिली नारायण फडके हिने महाराष्ट्रात प्रथम क्रमांक संपादन केला.

विद्यार्थ्यांना सामाजिक जबाबदारीची जाणीव व्हावी यासाठी संविधान दिनानिमित्त २६ नोव्हेंबर रोजी 'स्वच्छता अभियान' या विषयांतर्गत जागर फेरीचे आयोजन करण्यात आले.

शालेय अभ्यासाव्यतिरिक्त बाहय जगताचे ज्ञान विद्यार्थ्यांना मिळावे म्हणून विद्यालयात सहलींचे आयोजन केले जाते. त्यामध्ये वर्षासहल,क्षेत्रभेट, हिवाळी सहल यांचे आयोजन केले जाते. तसेच उदयान, बँक, पोस्ट ऑफीस, अशा ठिकाणांना भेटी देऊन तिथल्या कामकाजाची माहिती विद्यार्थ्यांना दिली जाते.

शासनाचा नवीन अभ्यासक्रम विद्यालयात राबविला जात आहे. इयत्ता पहिली पासून सेमी इंग्रजीचा वर्ग सुरू आहे. विद्यार्थ्यांना त्याप्रमाणे शिक्षण दिले जाते. विद्यालयात होणाऱ्या प्रत्येक परीक्षेनंतर विद्यार्थ्यांच्या मूल्यमापन संदर्भात पालकांना माहिती दिली जाते.पाल्याच्या शैक्षणिक व अन्य प्रगतीबाबत चर्चा करण्यासाठी शिक्षक पालक चर्चासत्र घेण्यात येते.

अनुभवाधिष्ठित कृतिशील उपक्रमांच्या माध्यमातून विद्यालयात क्रीडा स्पर्धा घेतल्या जातात. कराटे विषयाचे प्रशिक्षण दिले जाते.आजचे युग हे विज्ञान तंत्रज्ञान युग म्हणून ओळखले जाते म्हणून संगणकाचे विशेष शिक्षण हे प्राथमिक स्तरापासूनच विद्यालयात दिले जाते. विद्यालयात ऑडीओ व्हिजवल रूम, ई लायब्ररी ची सोय विद्यार्थ्यांना उपलब्ध आहे.

विद्यालयात शिक्षक-पालक संघ, शाळा समिती, परिवहन समिती, शाळा व्यवस्थापन समिती स्थापन करून वेळोवेळी चर्चासत्र घेऊन विद्यालयात विद्यार्थी-शिक्षक-पालक यांच्या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न केला जातो. शिक्षक-पालक संघातर्फे पालकांसाठी स्पर्धांचे आयोजन केले जाते. त्यात प्राविण्य मिळविणाऱ्या पालकांना बक्षिसे देवून सन्मानित करण्यात येते.

विद्यार्थ्यांचा शारीरिक विकास व आरोग्य यांचे महत्व लक्षात घेऊन विद्यालयात विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात येते. विद्यार्थ्यामध्ये काही दोष आढळल्यास त्या संदर्भात पालकांशी संपर्क साधला जातो.

धन्यवाद !

आपला स्नेहांकित,
**श्री. सुभाष गणपत मानकर**
मुख्याध्यापक
चांगू काना ठाकूर पूर्व प्राथमिक व प्राथमिक विद्यालय, नवीन पनवेल

Scanned with OKEN Scanner

## ✻ शाळेच्या वेळा ✻

| माध्यम | दिवस | पूर्व प्राथमिक विभाग | प्राथमिक व माध्यमिक विभाग |
|---|---|---|---|
| मराठी माध्यम | सोमवार ते शुक्रवार | दुपारी १२.२० ते ३.३० | दुपारी १२.२० ते ५.३० |
| | शनिवार | सुट्टी | सकाळी १२.२० ते ३.५५ |
| | महिना अखेर | सुट्टी | दुपारी १२.२० ते २.५५ |

वरील वेळापत्रकामध्ये काही बदल होणार असल्यास तशी दैनंदिनीमध्ये लेखी सूचना दिली जाईल.

## ✻ उपक्रम फी ✻

विद्यालयाने विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी विविध उपक्रम हाती घेतले आहेत. या उपक्रमासाठी प्रतिवर्षी उपक्रम शुल्क आकारण्यात येईल.

## ✻ शालेय गणवेश ✻

प्रवेश घेतलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांने विद्यालयाने ठरवून दिलेल्या रंगाचा व पध्दतीचा पूर्ण गणवेश परिधान करून येणे आवश्यक आहे.

## ✻ प्रवेशासंबंधी सर्वसाधारण नियम ✻

| इयत्ता | ३१ डिसेंबर पर्यंत वयोमर्यादा |
|---|---|
| छोटा शिशू | ४ वर्ष |
| मोठा शिशू | ५ वर्ष |
| पहिली | ६ वर्ष |

१) महाराष्ट्र सोडून अन्य राज्यातून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या दाखल्यावर त्या विभागातील शिक्षण अधिकाऱ्याची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.

## ✻ शाळा सोडण्यासंबंधीचे नियम ✻

१) विद्यार्थ्यांचे नाव शाळेतून कमी करावयाचे असल्याची सूचना पालकांनी महिन्याच्या १ तारखेपूर्वी करणे आवश्यक आहे. अन्यथा त्या महिन्याचे पूर्ण शुल्क आकारले जाईल. व त्यानंतरच शाळा सोडल्याचा दाखला देण्यात येईल. मार्च महिन्यात शाळेतून नाव काढाव याचे असल्यास एप्रिल व मे महिन्याचे शुल्क भरणे आवश्यक आहे.

२) शाळा सोडण्याच्या दाखल्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. दाखल्याची नक्कलप्रत मिळू शकणार नाही.

३) ज्या शाळेत प्रवेश घ्यायचा आहे त्या शाळेचे दाखला मागणीपत्र आणणे आवश्यक आहे.



Scanned with OKEN Scanner

## ✻ गैरहजेरीबाबतचे नियम ✻

१) अनुपस्थितीची रजा मंजूर करण्याबाबतचे अधिकार केवळ विद्यालयाच्या मुख्याध्यापकानाच आहेत.
२) योग्य व सबळ कारणाशिवाय विद्यार्थ्याने गैरहजर राहू नये.गैरहजेरीबाबतच्या कारणांची नोंद पालकांनी दैनंदिनीत करणे आवश्यक आहे. तसेच मुख्याध्यापक यांची पूर्व परवानगी घेऊन वर्गात बसावे.
३) कोणतीही पूर्वसूचना न देता सलग १५ दिवस विद्यार्थी अनुपस्थित राहिल्यास त्याचे नाव पटावरुन कमी करण्यात येईल. अशा विद्यार्थ्यास परत हजेरी पटावर घेण्यात येणार नाही. तथापि त्यांना पुन्हा प्रवेश दिला गेलाच तर प्रवेश शुल्कासह संपूर्ण शालेय शुल्क भरावे लागेल.

## ✻ विद्यार्थ्याचे आई–वडिल व पालक यांना सूचना ✻

१) पालकांनी आपल्या पाल्याला नियमितपणे शाळेत पाठवावे व दिलेला गृहपाठ केला आहे किंवा नाही हे पाहून तो करवून घ्यावा.
२) मुख्याध्यापकांच्या पूर्वसमंतीशिवाय पालकाने, आई-वडीलानी किंवा विद्यार्थ्याच्या अन्य नातेवाईकांनी शालेय वेळेत विद्यार्थ्याला किंवा वर्गशिक्षक व विषय शिक्षकांना परस्पर भेटू नये.
३) शालेय व्यवस्थापकांनी पाल्याविषयी केलेल्या सूचनांचा पालकांनी कटाक्षाने अवलंब करावा.
४) प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपूर्वी शालेय शुल्क पालकांनी भरणे आवश्यक आहे. अन्यथा ११ तारखेपासून दर आठवड्याला १० रुपये याप्रमाणे महिना अखेरीपर्यंत दंड मासिक शुल्का समवेत आकारला जाईल. सदर दंडासह शुल्काची रक्कम सलग तीन महिने भरावयाची बाकी राहिल्यास ३ महिन्यानंतर विद्यार्थ्याचे नाव शालेय पटावरुन कमी करण्यात येईल.
५) मुलांचे केस खूप वाढलेले नसावेत. मुलींनी आपले केस घट्ट बांधलेले असावेत. मुलांचे अथवा मुलींचे केस कपाळ किंवा डोळ्यावर येता कामा नयेत. मुलींनी कोणत्याही प्रकारचे अलंकार परिधान करु नयेत. विद्यार्थ्यांना मनगटी घड्याळ वापरण्यास सक्त मनाई आहे. फक्त मुलींनी छोटेसे कर्णभूषण वापरण्यास हरकत नाही. मौल्यवान वस्तू हरवल्यास शाळा कोणतीही जबाबदारी घेणार नाही. नखांना पॉलिश लावण्यास सक्त मनाई आहे.
६) आपल्या साधारण बाबींकरीता प्रथम वर्गशिक्षकांना भेटावे. अडचणींची सोडवणूक न झाल्यास मुख्याध्यापकांना भेटावे.

## ✻ बससेवा ✻

संस्थेने निश्चित केलेल्या बसमार्गावरुन व बसथांब्यावरुनच बसव्यवस्था उपलब्ध असेल. विहित नमुन्यातील अर्ज भरुन बसव्यवस्था निश्चित करता येईल.

## ✻ वैद्यकिय प्रमाणपत्र ✻

एखादया असाधारण रोगाने अथवा सांसर्गिक रोगाने विद्यार्थी आजारी असल्यास तो पूर्णपणे बरा झाल्याचे डॉक्टरांचे वैद्यकिय प्रमाणपत्र असल्याखेरीज त्याला शाळेत उपस्थित राहता येणार नाही.

## ✻ सहशालेय उपक्रम ✻

विद्यालयात भारतीय आणि पाश्चात्य संगीत, तसेच चित्रकला, हस्तकला शिकविण्याची सोय केलेली आहे. या सर्व उपक्रमाखेरीज नाट्यकला, वक्तृत्व, वादविवाद स्पर्धा यांचेही आयोजन केले जाते. लहान वयातच मुलामुलींमधील सुप्तगुणांचा शोध त्यांचा सर्वांगिण विकास साधावा हा यामागील हेतू आहे.
व्यक्तिगत गुणदर्शन व कलात्मक नैपुण्यप्राप्त विद्यार्थ्याचे आम्ही पारितोषिक व प्रमाणपत्रे देऊन दरवर्षी कौतुक करतो.

## ✻ ग्रंथालय ✻

शाळेचे एक सुसज्ज ग्रंथालय असून त्यात विविध विषयांवरील पुस्तके, मासिके आणि नियतकालिके ठेवलेली आहेत. कला, क्रीडा, साहित्य विज्ञान या क्षेत्रातील आपल्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्यासाठी विद्यार्थी त्यांचा लाभ घेऊ शकतात.

Scanned with OKEN Scanner

## * विद्यार्थ्यांना सूचना *

१) विद्यार्थ्यांनी शाळेने घालून दिलेले वक्तशीरपणा बद्दलचे व गणवेषासंबंधी सर्व नियम कटाक्षाने पाळावेत.

२) शिक्षकांशी बोलताना विद्यार्थ्यांनी नीट उभे रहावे.

३) विद्यार्थ्यांनी सर्वांबद्दल सहानुभूती व आदर बाळगावा.

४) शाळेला भेट देणाऱ्या पाहुण्यांना व शिक्षकांना विद्यार्थ्यांनी योग्य पद्धतीने अभिवादन करावे.

५) शिक्षक वर्गात येताच सर्व विद्यार्थ्यांनी शांतपणे उभे राहून आलेल्या शिक्षकांचे स्वागत करावे व त्या शिक्षकांनी खाली बसायला सांगितल्यानंतरच खाली बसावे.

६) वेळापत्रकानुसार आवश्यक ती पुस्तके व व्यवसाय घेऊन येणे आवश्यक आहे

७) शाळेच्या इमारतीमध्ये धावणे, ओरडणे, मोठ्याने बोलणे अथवा अन्य प्रकारे गडबड गोंधळ करणे यास सक्त मनाई आहे. जिन्यामधून अथवा व्हरांड्यामधून चालताना शांतपणे व हळू चालावे. वर्गात जाताना डाव्या बाजूने चालावे.

८) शाळेतून घरी जाण्यास उशीर होणार असल्यास विद्यार्थ्यांनी आपल्या आईवडिलांना तशी पूर्व कल्पना द्यावी.

९) आपल्या स्वतःच्या पुस्तकावर तसेच इतर शैक्षणिक साहित्यावर आपले स्वतःचे नांव लिहावे.

१०) विद्यार्थ्यांनी आपली नावे शाळेच्या कोणत्याही भिंतीवर खडूने, पेन्सिलने अथवा पेनने लिहून, कोरुन शाळेच्या भिंती खराब करु नयेत. पेन झटकून शाई उडवू नये. बेंच व डेस्कवर आपले नाव घालू नये अथवा कोरु नये.

११) शाळेच्या इमारतीची व कोणत्याही वस्तूची मोडतोड झाल्यास त्याची माहिती त्वरित वर्गशिक्षकास कळवावी. कडक चेंडू घेऊन शाळेच्या परिसरात खेळू नये.

१२) मुख्याध्यापक यांच्या संमतीशिवाय शालेय कामकाजाच्या वेळेपूर्वी विद्यार्थ्याने शाळेबाहेर अथवा घरी जाऊ नये.

१३) वारंवार गैरहजर राहणे, वक्तशीरपणाबद्दल बेदरकारी, आळशी प्रवृत्ती, आज्ञापालन न करणे, शाळेच्या नेहमीच्या कामकाजात बाधक असे लांच्छनास्पद वर्तन करणाऱ्या विद्यार्थ्याला शाळेतून काढून टाकण्यात येईल.

१४) शाळेच्या शिक्षकांबद्दल अथवा व्यवस्थापकांबद्दल अनादराने गैरउद्गार काढणे किंवा कोणताही गंभीर स्वरुपाचा गुन्हा करणाऱ्या विद्यार्थ्याला अत्यंत कडक शासन केले जाईल.

१५) कोणत्याही प्रकारचा मौल्यवान अलंकार विद्यार्थ्याने अंगावर घालू नये. तसेच मौल्यवान वस्तू शाळेत आणू नयेत. अशा वस्तू अथवा अलंकार गहाळ झाल्यास शाळा त्यांची जबाबदारी घेणार नाही. आपल्या स्वतःच्या शालेय वस्तूंची काळजी विद्यार्थ्याने स्वतः घेतली पाहिजे.कोणत्याही प्रकारची मासिके, नियतकालिके, कादंबऱ्या अथवा चित्रकथा यांची पुस्तके विद्यार्थ्यांनी शाळेत आणू नयेत.

१६) कोणत्याही प्रकारचा भरणा स्टँप असणाऱ्या पावतीवरच केला जाईल. पैसे भरल्याची योग्य पावती न घेता पैसे भरले असल्यास अशा रकमेबाबत शालेय व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही. पैसे भरल्याची पावती घेतल्याशिवाय कोणत्याही प्रकारचा पैशाचा भरणा करु नये.

****

Scanned with OKEN Scanner

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे,

# चांगू काना ठाकूर विद्यालय, नवीन पनवेल

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता विद्यार्थी संख्या दर्शविणारा तक्ता

## ( मराठी प्राथमिक विभाग )

| क्र. | वर्ग | तुकडी संख्या | उत्तीर्ण होऊन आलेले विद्यार्थी | आवश्यक विद्यार्थीसंख्या | शाळा सोडून गेलेले विद्यार्थी | एकुण विद्यार्थी संख्या | | | शिल्लक जागा | जास्त प्रवेश |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | एकुण विद्यार्थी | नवीन प्रवेश | एकुण विद्यार्थी संख्या | | |
| १ | पहिली | २ | ५८ | १२० | ३ | ५५ | ३० | ८५ | ३५ | - |
| २ | दुसरी | २ | ११४ | १२० | ३ | १११ | ७ | ११८ | २ | - |
| ३ | तिसरी | २ | १३० | १२० | ० | १३० | ३ | १३३ | ० | १३ |
| ४ | चौथी | २ | १३२ | १२० | ० | १३२ | ० | १३२ | ० | १२ |
| | एकूण | ८ | ४३४ | ४८० | ६ | ४२८ | ३३ | ४६१ | ४४ | २५ |

## ( मराठी पुर्व प्राथमिक विभाग )

| क्र. | वर्ग | तुकडी संख्या | उत्तीर्ण होऊन आलेले विद्यार्थी | आवश्यक विद्यार्थीसंख्या | शाळा सोडून गेलेले विद्यार्थी | एकुण विद्यार्थी संख्या | | | शिल्लक जागा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | एकुण विद्यार्थी | नवीन प्रवेश | एकुण विद्यार्थी संख्या | |
| १ | छोटा शिशू | १ | ० | ४० | ० | ० | १३ | १३ | २७ |
| २ | मोठा शिशू अ | १ | २८ | ४० | ० | २८ | ० | २८ | १२ |
| ३ | मोठा शिशू ब | १ | ० | ४० | ० | ० | १२ | १२ | २८ |
| | एकूण | ३ | २८ | १२० | ० | २८ | ०५ | ५३ | ६७ |



Scanned with OKEN Scanner

# विद्यालयातील शिक्षक कर्मचारी वृंद

## शै. वर्ष २०२५-२०२६

| अ.क | संपूर्ण नाव | पदनाम | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| १ | श्री. सुभाष गणपत मानकर | मुख्याध्यापक | B.A.D.Ed.D.S.M. |
| २ | श्री. युवराज मधूकर धनवटे | सहा. शिक्षक | B.A.D.Ed. |
| ३ | श्री. महादू भिवाजी मेंगाळ | सहा. शिक्षक | H.S.C.D.Ed. |
| ४ | श्री. राणुजी दिगंबर तुपारे | सहा. शिक्षक | B.A.D.Ed. |
| ५ | श्री. देशमूख प्रदिप विष्णू | सहा. शिक्षक | H.S.C.D.Ed. |
| ६ | श्री. पंढरीनाथ तुकाराम जाधव | सहा. शिक्षक | B.A.D.Ed. |
| ७ | सौ. विजयश्री जनार्दन थळी | सहा. शिक्षक | B.A.D.Ed. |
| ८ | सौ. लता नामदेव मोटे | सहा. शिक्षक | B.A.D.Ed. |
| ९ | श्री. प्रविण दशरथ पाटील | सहा. शिक्षक | M.A.D.Ed. |
| १० | सौ. वर्षा बाळकृष्ण पाटील | सहा. शिक्षक | B.A.D.Ed. |
| ११ | सौ. मंजिरी मंगेश धोत्रे | सहा. शिक्षक | B.A. Montesseri Corse |
| १२ | सौ. शुभांगी विनायक बोराडे | सहा. शिक्षक | B.com Montesseri Corse |

Scanned with OKEN Scanner

# विषय व वह्यांचा तपशील शै. वर्ष २०२६-२०२७

मुलांना तासिकेला योग्य विषयाच्या वह्या काढता याव्यात यासाठी पालकांनी मुलांच्या वह्यांना क्रमांक

इयत्ता १ली

| अ.क | विषय | वह्यांचा प्रकार | क्रमांक | | वह्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | मराठी | १०० पानी दुरेघी | 1 | १ | १ |
| २ | गणित | १०० पानी लहान चौकट | 2 | २ | १ |
| ३ | इंग्रजी | १०० पानी चार रेघी | 3 | ३ | १ |
| ४ | संगणक | १०० पानी दुरेघी | 4 | ४ | १ |
| ५ | कार्यानुभव | १०० पानी स्केच वही | 5 | ५ | १ |

क्रमिक पुस्तके : शासना कडून उपलब्ध झाल्यावर विद्यार्थ्यांना देण्यात येतील

इयत्ता २ री

| अ.क | विषय | वह्यांचा प्रकार | वह्यांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | मराठी | १०० पानी दुरेघी | १ |
| २ | गणित | १०० पानी लहान चौकट | १ |
| ३ | इंग्रजी | १०० पानी चार रेघी | १ |
| ४ | संगणक | १०० पानी दुरेघी | १ |
| ५ | कार्यानुभव | १०० पानी स्केच वही | १ |

क्रमिक पुस्तके : शासना कडून उपलब्ध झाल्यावर विद्यार्थ्यांना देण्यात येतील

इयत्ता ३ री

| अ.क | विषय | वह्यांचा प्रकार | वह्यांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | मराठी | १०० पानी एक रेघी | १ |
| २ | इंग्रजी | १०० पानी चार रेघी | १ |
| ३ | गणित | १०० पानी एक रेघी | १ |
| ४ | परिसर अभ्यास | १०० पानी एक रेघी | १ |
| ५ | संगणक | १०० पानी एक रेघी | १ |
| | कार्यानुभव | १०० पानी स्केच वही | १ |

क्रमिक पुस्तके : शासना कडून उपलब्ध झाल्यावर विद्यार्थ्यांना देण्यात येतील



Scanned with OKEN Scanner

इयत्ता ४ थी

| अ.क | विषय | वह्यांचा प्रकार | वह्यांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | मराठी | १०० पानी एक रेघी | १ |
| २ | इंग्रजी | १०० पानी चार रेघी | १ |
| ३ | गणित | १०० पानी एक रेघी | १ |
| ४ | परिसर - १ | १०० पानी एक रेघी | १ |
| ५ | परिसर - १ | १०० पानी एक रेघी | १ |
| ६ | संगणक | १०० पानी एक रेघी | १ |
| ७ | कार्यानुभव | १०० पानी स्केच वही | १ |

क्रमिक पुस्तके : शासना कडून उपलब्ध झाल्यावर विद्यार्थ्यांना देण्यात येतील

Scanned with OKEN Scanner

# शालांतर्गत शैक्षणिक स्पर्धा

## शै. वर्ष २०२६-२०२७

| अ.क | स्पर्धेचे नाव | वार | दिनांक | वर्गांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | हस्ताक्षर स्पर्धा | शनिवार | २७.०६.२०२६ | २ री ते ४ थी |
| २ | कै.चांगू काना ठाकूर साहेब यांच्या पुण्यातिथी निमित्त रंगभरण चित्रकला स्पर्धा | शनिवार | ११.०७.२०२६ | १ ली ते ४ थी |
| ३ | गुरूपौर्निमेनिमित्त कथाकथन स्पर्धा विषय ; गुरू-शिष्याच्या गोष्टी | सोमवार | २७.७.२०२६ | १ ली ते ४ थी |
| ४ | स्वातंत्र्य दिनानिमित्त वेशभूषा स्पर्धा | गुरूवार | १३.०८.२०२६ | १ ली ते ४ थी |
| ५ | निबंध स्पर्धा विषय :- २ री साठी १) माझे बाबा, २) माझी शाळा व ३ री / ४ थी साठी विषय :- My Mother, My School Teacher | शुक्रवार | २१.०८.२०२६ | २ री ते ४ थी |
| ६ | उत्स्फूर्त भाषण स्पर्धा<br>विषय माझे दप्तर, माझा आवडता खेळ माझे घर, रेल्वेस्टेशन वरील विषयाच्या बंद चिठ्या केल्या जातील स्पर्धकाने उचललेल्या बंद चिठ्ठीतील विषयावर ५ ते ७ ओळी भाषण करावे. | शनिवार | १२.०९.२०२६ | २ री ते ४ थी |
| ७ | गांधीजयंती निमित्त भाषण स्पर्धा विषय - माझा आवडता क्रांतिकारक | बुधवार | ३०.०९.२०२६ | ३ री ते ४ थी |
| ८ | बालदिनानिमित्त नृत्य स्पर्धा | बुधवार | २५.११.२०२६ | १ ली ते ४ थी |
| ९ | नाताळनिमित्त स्मरणशक्ती स्पर्धा | सोमवार | २१.१२.२०२६ | १ ली ते ४ थी |
| १० | प्रजासत्ताक दिनानिमित्त देशभक्तीपर गीतगायन स्पर्धा | शुक्रवार | २३.०१.२०२७ | १ ली ते ४ थी |

Scanned with OKEN Scanner

## शालेय वार्षिक दिनदर्शिका (विभाग : मराठी प्राथमिक)

(शैक्षणिक वर्ष-२०२६-२०२७)

| अ.क्र. | माहे | दिनांक | वार | समिती | कार्यक्रमाचे नाव | गट |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | जून | 21-06-2026 | शनिवार | सांस्कृतिक | आंतरराष्ट्रीय योग दिन | १ली ते ४थी |
| 2 | | 27-06-2026 | शनिवार | शा.स्पर्धा | हस्ताक्षर स्पर्धा | २री ते ४थी |
| 3 | | 30-06-2026 | मंगळवार | पालक समिती | पालक-शिक्षक सभा (पालक प्रतिनिधी निवड सभा ) | १ली ते ४थी |
| 4 | जुलै | 04-07-2026 | शनिवार | पालक समिती | कार्यकारिणी निवड सभा | - |
| 5 | | 11-07-2026 | शनिवार | शा.स्पर्धा | कै.चांगू काना ठाकूर साहेब यांच्या पुण्यतिथीनिमित रंगभरण,चित्रकला स्पर्धा | १ली ते ४थी |
| 6 | | 13-07-2026 | सोमवार | सहल | वर्षा सहल | १ली ते ४थी |
| 7 | | 14-07-2026 | मंगळवार | सहल | वर्षा सहल | १ली ते ४थी |
| 8 | | 14-07-2026 | मंगळवार | सांस्कृतिक | दीपपूजन | १ली ते ४थी |
| 9 | | 15-07-2026 | बुधवार | बाह्यस्पर्धा | गौतम एज्युकेशन सोसायटी आयोजित सप्तरंग राज्यस्तरीय रंगभरण स्पर्धा | १ली ते ४थी |
| 10 | | 18-07-2026 | शनिवार | परिवहन | परिवहन सभा | - |
| 11 | | 21-07-2026 | मंगळवार | शा.स्पर्धा | निबंध स्पर्धा | २री ते ४थी |
| 12 | | 24-07-2026 | शुक्रवार | सांस्कृतिक | आषाढी एकादशी | १ली ते ४थी |
| 13 | | 27-07-2026 | सोमवार | बाह्यस्पर्धा | कला चिल्ड्रन आयोजित चित्रकला रंगभरण हस्ताक्षर निबंध स्पर्धा | १ली ते ४थी |
| 14 | | 28-07-2026 | मंगळवार | शा.स्पर्धा | गुरुपौर्णिमेनिमित्त कथाकथन स्पर्धा | १ली ते ४थी |
| 15 | | 29-07-2026 | बुधवार | सांस्कृतिक | गुरुपौर्णिमेनिमित्त कार्यक्रम | १ली ते ४थी |
| 16 | ऑगस्ट | 01-08-2026 | शनिवार | सांस्कृतिक | लोकमान्य टिळक पुण्यतिथी | १ली ते ४थी |
| 17 | | 05-08-2026 | बुधवार | परीक्षा | चाचणी क्र.1 (तोंडी व लेखी )04-8-2025 ते 07-8-2025 | १ली ते ४थी |
| 18 | | 11-08-2026 | सोमवार | आरोग्य समिती | सर्वसाधारण आरोग्य तपासणी | १ली ते ४थी |
| 19 | | 12-08-2026 | बुधवार | शा.स्पर्धा | स्वातंत्र्य दिनानिमित्त वेशभूषा स्पर्धा | १ली ते ४थी |
| 20 | | 13-08-2026 | गुरुवार | सांस्कृतिक | स्वातंत्र्य दिनानिमित्त कार्यक्रम व पारितोषिक वितरण | १ली ते ४थी |
| 21 | | 17-08-2026 | सोमवार | सांस्कृतिक | नागपंचमी | १ली ते ४थी |
| 22 | | 22-08-2026 | शनिवार | पालक समिती | चाचणी क्र.१ (मूल्यमापन सभा) | १ली ते ४थी |
| 23 | | 22-08-2026 | शनिवार | शाळा समिती | शाळा समिती सभा क्र.1 | - |
| 24 | | 25-08-2026 | मंगळवार | सांस्कृतिक | रक्षाबंधन कार्यक्रम | १ली ते ४थी |
| 25 | सप्टेंबर | 04-09-2026 | शुक्रवार | सांस्कृतिक | शिक्षक दिन | १ली ते ४थी |
| 26 | | 09-09-2026 | बुधवार | शा.स्पर्धा | उत्स्फूर्त भाषण स्पर्धा | १ली |
| 27 | | 27-09-2026 | शनिवार | पालक समिती | पालक-शिक्षक संघ (कार्यकारी मंडळ २०२३-२४) सभा | - |
| 28 | | 01-10-2026 | गुरुवार | शा.स्पर्धा | गांधी जयंती निमित्त भाषण स्पर्धा | ३री ते ४थी |
| 29 | | 01-10-2026 | गुरुवार | सांस्कृतिक | म.गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री जयंती | १ली ते ४थी |
| 30 | | 01-10-2026 | गुरुवार | सांस्कृतिक | म.गांधी जयंती निमित भाषण स्पर्धा | १ली ते ४थी |



Scanned with OKEN Scanner

| अ.क्र. | माहे | दिनांक | वार | समिती | कार्यक्रमाचे नाव | गट |
|---|---|---|---|---|---|---|
| 31 | ऑक्टोबर | 03-10-2026 | शनिवार | पालक समिती | प्रथम सत्र परीक्षा (मूल्यमापन सभा) | १ली ते ४थी |
| 32 | | 15-10-2026 | गुरुवार | सांस्कृतिक | वाचन प्रेरणा दिन | १ली ते ४थी |
| 33 | | 19-10-2026 | सोमवार | सांस्कृतिक | नवरात्रोत्सव दांडिया रास कार्यक्रम | १ली ते ४थी |
| 34 | | 19-10-2026 | सोमवार | सांस्कृतिक | सरस्वती पूजन | १ली ते ४थी |
| 35 | | 26-10-2026 | सोमवार | परीक्षा | सत्र परीक्षा क्र.1 (तोंडी व लेखी )06-10-2025 ते 17-10-2025 | १ली ते ४थी |
| 36 | नोव्हेंबर | 25-11-2026 | बुधवार | सांस्कृतिक | शैक्षणिक चित्रपट | १ली ते ४थी |
| 37 | | 28-11-2026 | शनिवार | विज्ञान समिती | शालेय विज्ञान प्रदर्शन | १ली ते ४थी |
| 38 | डिसेंबर | 01-12-2026 | मंगळवार | सहल | क्षेत्रभेट: सिडको उद्यान नवीन पनवेल | १ली व २री |
| 39 | | 02-12-2026 | बुधवार | सांस्कृतिक | बालसभा कार्यक्रम | ४थी |
| 40 | | 03-12-2026 | गुरुवार | सहल | क्षेत्रभेट: पोस्ट ऑफिस नवीन पनवेल | ३री |
| 41 | | 05-12-2026 | शनिवार | सहल | क्षेत्रभेट:अभ्युदय को-ऑप. बँक लि. नवीन पनवेल. | ४थी |
| 42 | | 10-12-2026 | गुरुवार | सहल | वार्षिक सहल | १ली ते ४थी |
| 43 | | 12-12-2026 | शनिवार | शा.स्पर्धा | बाल दिनानिमित्त नृत्य स्पर्धा | १ली ते ४थी |
| 44 | | 12-12-2026 | शनिवार | सांस्कृतिक | आनंद मेळावा कार्यक्रम | १ली |
| 45 | | 14-12-2026 | सोमवार | क्रीडा समिती | वार्षिक क्रीडास्पर्धा [ वैयक्तिक व सांघिक ] 8/11/25 ते 13-12-2025 | १ली ते ४थी |
| 46 | | 19-12-2026 | शनिवार | पालक समिती | शिक्षक स्पर्धा | - |
| 47 | | 21-12-2026 | सोमवार | सांस्कृतिक | आजी आजोबा दिन | १ली ते ४थी |
| 48 | | 21-12-2026 | सोमवार | आरोग्य समिती | सर्वसाधारण आरोग्य तपासणी | १ली ते ४थी |
| 49 | | 22-12-2026 | मंगळवार | सांस्कृतिक | पारितोषिक वितरण कार्यक्रम १ | १ली ते ४थी |
| 50 | | 24-12-2026 | गुरुवार | शा.स्पर्धा | नाताळनिमित स्मरणशक्ती स्पर्धा | १ली ते ४थी |
| 51 | | 26-12-2026 | शनिवार | पालक समिती | पालक स्पर्धा | - |
| 52 | जानेवारी | 06-01-2027 | बुधवार | स्नेहसंमेलन | स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण | १ली ते ४थी |
| 53 | | 23-01-2027 | शनिवार | सांस्कृतिक | प्रजासत्ताक दिनानिमित्त विशेष कार्यक्रम | १ली ते ४थी |
| 54 | | 25-01-2027 | सोमवार | शा.स्पर्धा | प्रजासत्ताक दिनानिमित्त देशभक्तीपर गीत गायन स्पर्धा | १ली ते ४थी |
| 55 | | 27-01-2027 | बुधवार | परीक्षा | चाचणी क्र.2( तोंडी व लेखी )27-1-2026 ते 30-1-2026 | १ली ते ४थी |
| 56 | फेब्रुवारी | 04-02-2027 | मंगळवार | कब बुलबुल | एक दिवसीय कब बुलबुल शिबीर | ३री ते ४थी |
| 57 | | 13-02-2027 | शनिवार | शाळा समिती | शाळा समिती सभा क्र.२ | - |
| 58 | | 20-02-2027 | शनिवार | पालक समिती | चाचणी क्र.२ (मूल्यमापन सभा) | १ली ते ४थी |
| 59 | मार्च | 29-03-2027 | सोमवार | परीक्षा | सत्र परीक्षा क्र.2 (तोंडी व लेखी ) | १ली ते ४थी |
| 60 | एप्रिल | 30-04-2027 | शुक्रवार | परीक्षा | वार्षिक निकाल | १ली ते ४थी |



Scanned with OKEN Scanner



दहीहंडी कार्यक्रम ( पूर्व प्राथमिक विभाग )



विद्यालयात महात्मा गांधी जयंती व
लाल बहादुर शास्त्री जयंती उत्साहात साजरी



आजी - आजोबांचे स्वागत करताना
आमच्या विद्यालयातील विद्यार्थींनी

Scanned with OKEN Scanner



आनंद मेळावा कार्यक्रम



क्रिडा स्पर्धा ( प्राथमिक विभाग )



स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त
वेशभुषा स्पर्धा (पूर्व प्राथमिक विभाग)

Scanned with OKEN Scanner




लोकनेते माजी खासदार माननीय श्री.रामशेठ ठाकूर साहेब यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त संस्था स्तरावर चांगू काना ठाकूर इंग्रजी पूर्व प्राथमिक विद्यालय नवीन पनवेल येथील रंगभरण स्पर्धेत कुमारी सानवी विठ्ठल साबळे तृतीय क्रमांक



श्रीमती ललिता दहीतुले मॅडम शिक्षणाधिकारी (प्राथमिक) रायगड जिल्हा परिषद यांची शाळेला सदिच्छा भेट



राष्ट्रीय स्तरावरील सक्सेस अबॅकस अँड एज्युकेशन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड आयोजित केलेल्या स्पर्धेमध्ये कु. समन्विता नितीन कुंभार हिला मा. श्री. राजू नाईकवडी (माजी डेप्युटी डायरेक्टर शिक्षण विभाग, मुंबई) यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले




रायगड भारत स्काऊट - गाईड आयोजित खरी कमाई उपक्रमामध्ये आपल्या विद्यालयातील कब- बुलबुल युनिट मधील विद्यार्थ्यांनी सन २०२४-२५ मध्ये रायगड जिल्ह्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला.



Scanned with OKEN Scanner



पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभाग शिक्षकवृंद



पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभाग
शिक्षकेतर कर्मचारी वर्ग

Scanned with OKEN Scanner



।। विद्या विनयेन शोभते ।।

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे

# चांगू काना ठाकूर

# मराठी पूर्वप्राथमिक व प्राथमिक विद्यालय

प्लॉट नं. ८, सेक्टर नं. १४, कै. जनार्दन भगत मार्ग,
सिडको कॉलनी, नवीन पनवेल, जि. रायगड, पिन. ४१० २०६
दूरध्वनी : ०२२२ ७४६ ५८८०

Scanned with OKEN Scanner